दैनिक मराठवाडा पत्र



# आष्टीत सार्वजनिक महात्मा ज्योतिबा फुले जयंती उत्सव समितीच्या वतीने भव्य रक्तदान शिबिर

### दीडशे रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग महिलांचा ही सहभाग

**आष्टी । प्रतिनिधी**

सार्वजनिक महात्मा फुले जयंती उत्सव आष्टी यांच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सामाजिक बांधिलकी जपत आयोजित या उपक्रमात तब्बल १४८ रक्तदात्यांनी रक्तदान करून मानवतेचा संदेश दिला.या रक्तदान शिबिराचे आयोजन सार्वजनिक महात्मा फुले जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले होते. सकाळपासूनच युवक, सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटनांचे पदाधिकारी तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावत



रक्तदानासारख्या पवित्र कार्यात सहभाग नोंदविला.कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा ज्योतिराव फुले डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी रक्तदानाचे महत्त्व सांगताना, रक्तदान हेच श्रेष्ठ दान असून अनेक गरजू रुग्णांना जीवनदान देणारे कार्य आहे, असे मत व्यक्त केले. रक्तपेढींमधील साठा कमी पडू लागला आहे. हीच गरज लक्षात घेऊन सामाजिक बांधिलकी राखत व तरुणांना रक्तदानाविषयी माहिती मिळावी हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवून आष्टी शहरातील संत शिरोमणी सावता महाराज मंदीरात सार्वजनिक महात्मा ज्योतिबा फुले जयंती उत्सव समितीच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.दि.९ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता रक्तदान शिबिराला सुरूवात झाली १४८ रक्तदात्यांनी रक्तदान केले.शिबिरात सहभागी झालेल्या रक्तदात्यांचा आयोजकांच्या वतीने प्रशस्तीपत्र, गुलाबपुष्प व आकर्षक भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला.अहिल्यानगर येथील सुरभी रक्तपेढीच्या वैद्यकीय पथकाने संपूर्ण प्रक्रियेत सहकार्य करत रक्तसंकलनाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली.उपक्रमामुळे समाजात रक्तदानाबाबत जनजागृती निर्माण होऊन युवकांमध्ये सामाजिक उत्तरदायित्वाची भावना अधिक दृढ झाली, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.रक्तदात्यांना केळी, फ्रुटी देण्यात आली हे शिबीर यशस्वी करण्यासाठी सार्वजनिक महात्मा फुले जयंती उत्सव समितीच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.मोठ्या संख्येने नागरिक, तरुण उपस्थित होते.

# लिंबागणेश येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंतीनिमित्त अभिवादन

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील बालाघाटावरील लिंबागणेश येथे अखंड क्रांतीचे जनक, सत्यशोधक समाजाचे संस्थापक व समाजसुधारक क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्त ग्रामपंचायत कार्यालयात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच बाळासाहेब जाधव होते. यावेळी महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व श्रीफळ फोडून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सेवा सोसायटीचे चेअरमन रविंद्र निर्मळ यांनी केले,



तर आभार प्रदर्शन रमेश गायकवाड यांनी केले.

यावेळी माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे, साहेबराव निर्मळ, अॅड. गणेश वाणी, ग्रामपंचायत सदस्य दामोदर थोरात, रमेश गायकवाड, जीवन मुळे, सुरेश निर्मळ, मोहनराव कोटुळे, महादेव वाणी, ज्ञानेश्वर कुदळे, संजय पावले, खंडू वाणी, श्रीराम तागड, भीमराव बोराटे, सुभाष मुळे, मल्हारी आबदार, पोपट निर्मळ आदी उपस्थित होते.

महात्मा फुले यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी – डॉ. गणेश ढवळे

यावेळी बोलताना सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी महात्मा फुले यांच्या कार्याचा गौरव केला.

विद्येविना मती गेली, मतिविना निती गेली... हा महात्मा फुले यांचा विचार उद्धृत करत त्यांनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तन घडवून आणण्याचे कार्य महात्मा फुले यांनी केले असून, स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवून समाजाला नवी दिशा दिली, असे त्यांनी सांगितले. तसेच सावित्रीबाई फुले यांच्या सहकार्याने मुलींसाठी शाळा सुरू करून शिक्षण सर्वांसाठी खुले केले. अज्ञानाचा अंधार दूर करून समाज सक्षम बनवण्याचा त्यांचा विचार आजही मार्गदर्शक आहे, असेही त्यांनी नमूद केले.

महात्मा फुले यांनी सत्यशोधक विचारातून समाजाला जागृत करत अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा दिली. धर्माच्या नावाने चालणाऱ्या अनिष्ट रूढी-परंपरांना विरोध करून माणुसकी हाच खरा धर्म असल्याचा संदेश त्यांनी दिला. शेतकरी हा देशाचा कणा असून तो अन्याय, कर्जबाजारीपणा व सामाजिक उपेक्षेखाली दबला जात असल्याचे वास्तवही त्यांनी मांडले, असे डॉ. ढवळे यांनी सांगितले.

सामाजिक समतेसाठी आयुष्यभर झटणारे महात्मा ज्योतिबा फुले यांचे कार्य आजही समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.



*माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयामध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करताना कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी (नाना) मोरे सचिव हरिभाऊ सवणे साहेब व सर्व अधिकारी कर्मचारी बांधव*



*बीड : शहरातील क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यास जयंतीनिमित्त पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्यासह राजू जोगदंड, अर्जुन दळे, संदिप बेदरे, वैभव स्वामी, अक्षय कोकाटे, संभाजी गायकवाड आदी.*

## क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले जयंतीनिमित्त मातोश्री बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांना मोफत पुस्तक वाटप

**बीड । प्रतिनिधी**

विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली... हा शिक्षणाचा महान विचार तळागाळापर्यंत पोहोचवणारे क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून 'मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, बीड' यांच्या वतीने विद्यार्थ्यांना मोफत पुस्तकांचे वाटप करण्यात आले. हा स्तुत्य उपक्रम दि.११ एप्रिल २०२६ मातोश्री ग्रामीण रुग्णालय, काठोडा (ता. जि. बीड) येथे मोठ्या उत्साहात पार पडला.

महात्मा फुले यांनी शिक्षणाचे महत्त्व समाजाला पटवून दिले. त्यांचा हाच वैचारिक वारसा पुढे नेण्याच्या उद्देशाने संस्थेने हा स्तुत्य उपक्रम राबविला. आजच्या मोबाईलच्या युगात विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि त्यांच्यावर चांगले संस्कार घडावेत, या हेतूने विद्यार्थ्यांना विविध माहितीपर आणि प्रेरणादायी



पुस्तके भेट देण्यात आली.

वाटप करण्यात आलेल्या पुस्तकांमध्ये प्रामुख्याने खालील पुस्तकांचा समावेश होता:

महात्मा जोतिबा फुले यांचे चरित्र,साने गुरुजी लिखित 'श्यामची आई', डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनचरित्र,बोधकथा आणि संस्कारक्षम बालसाहित्य ,सामान्य ज्ञान (ऋशपशीरश्र घपेुश्रशवसश) आणि स्पर्धा परीक्षांची प्राथमिक पुस्तके,शालेय अभ्यासक्रमाला पूरक अशी विज्ञानाची व गणिताची पुस्तके,यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी महात्मा फुले यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला व प्रत्येकाने आयुष्यात वाचनाची सवय अंगीकारावी असे आवाहन केले. या कार्यक्रमासाठी मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे सचिव तेजस पवार, रोहन डोळस, डॉ. स्नेहल दिलीप पवार यांच्यासह संस्थेचे इतर सर्व सदस्य, गावकरी आणि बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## के.एस.पी.विद्यालय येथे महात्मा जोतिराव फुले जयंती उत्साहात साजरी

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील (कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय) के. एस.पी विद्यालय येथे महात्मा जोतिराव फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. महात्मा जोतिराव फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करुन कार्यक्रमास सुरवात केली. या कार्यक्रमामध्ये मुलांना जोतिराव फुले यांच्या समाज कार्या विषयी धडे देण्यात आले. उपस्थितीत मान्यवरांनी आपल्या भाषनामध्ये सांगितले की, महात्मा फुलेंनी शिक्षणाची प्रेरणा अहिल्या नगर मिस फरार यांच्याकडून घेतली होती. त्यांनी मुलींच्या शिक्षणासाठी अतोनात प्रयत्न केले. त्यांनी मुलींसाठी शाळा सुरू केल्याचं त्याच बरोबर अस्पृश्य मुलांसाठी देखील शाळा सुरू केलीत. महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाची प्रेरणा मावस बहीण -सगुणाबाई क्षिरसागर यांच्याकडून मिळाली. जोतीराव जसे सार्वजनिक ठिकाणी उपदेशपर



भाषणे करीत, तसेच ते शाळांतील शिक्षकांना आदर्श पाठ देऊन शिक्षकांनी मुलांच्या हिताच्या दृष्टीने योग्य ती साधनेनी उपकरणे वापरावी म्हणून शिक्षकांनाही उत्तेजन देत असत. नंतर मुलांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती श्री. ऋषिकेशजी शेळके, जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख, श्री राऊत एम. एन., विस्तार अधिकारी, शेख शाकेर सर, विशेष शिक्षक शाळेच्या मार्गदर्शक सौ. अंजलीताई शेळके, शाळेचे प्रा. मुख्याध्यापक विशाल सुपेकर, तसेच शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या उपस्थितीमध्ये कार्यक्रम संपन्न झाला.

## महिलांच्या विविध स्पर्धांना प्रतिसाद जयभीम महोत्सव उत्सव समितीचे नियोजन

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी दि.५ ते १४ या कालावधीत जयभीम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने महिलांच्या विविध स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न झाल्या, या स्पर्धेत सर्वच वयोगटातील स्पर्धक मोठ्या संख्येने हभागी झाले होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शुक्रवारी (दि.१०) रोजी महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांचे नियोजन अरुणाताई आठवले यांनी सुयोग्य पद्धतीने केले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शैलजा ओव्हाळ होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापक प्रणिता बोराडे, शिलताई सिरस१ट, मंदा मस्के आदी मान्यवर उपस्थित



होते. स्पर्धेदरम्यान महिलांनी विविध महापुरुषांच्या प्रतिमा तसेच आकर्षक रेखाटने साकारून आपले कौशल्य दाखविले. महिलांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा आणि त्यांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. सहभागी महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभल्याने कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.स्पर्धे चे परीक्षक म्हणून डॉ. पल्लवी इलापर्ले आणि डॉ. वंदना फाटले यांनी काम पाहिले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमिला सरवदे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. पांडुरंग सुतार यांनी केले, तर आभार प्रिती सिरसाट यांनी मानले. दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी महिलांच्या स्पर्धांचा हा उपक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले.

## महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी



**बीड । प्रतिनिधी**

श्री नारायण मा. व उच्च माध्यमिक विद्यालयात महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. बीड तालुक्यातील आहेर चिंचोली येथे प्रथम विद्यालयात संस्थेचे अध्यक्ष मा. महादेवराव काळे आण्णा यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पुजन केले . प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव तथा प्राचार्य श्री अमोल काळे सर उपस्थित होते.

श्री करपे सर यांनी महात्मा फुले यांच्या जीवन कार्याविषयी माहिती दिली. सूत्रसंचालन प्रा.धर्मराज पौळ सर यांनी केले तर प्रास्ताविक प्रा.अशोक घरत सर यांनी केले आभार प्रदर्शन श्री शेख सर यांनी मानले. कार्यक्रमाला प्रा. श्री मस्के जी.बी,श्री मुरमुडे ए .एन, प्रा. रकटे पि. आर, श्रीमती काळे मॅडम, श्रीमती भुतावळे मॅडम, श्रीमती मस्के मॅडम, श्रीमती जगताप मॅडम ,श्री करपे सर, श्री इनकर बी.जे, श्री रकटे बी. आर,श्री चौधरी पी. बी, श्री रकटे एन. पी,कदम एस .व्ही, श्री पवार पी .एल, तसेच विद्यार्थी,विद्यार्थिनी,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वृद्ध महिलेचे सोने चाकरवाडी येथून जानेवारी महिन्यात चोरीला गेले मात्र ते नेकनूर पोलिसांना सापडलेच नाही

### नेकनूर पोलीस स्टेशन मध्ये पोलीसच कार्यरत आहेत का आसा प्रश्न पंचक्रोशीतील जनतेला पडला

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात राहणारी एक वयोवृद्ध महिला जी स्वतः धुणी भांडी करून नवऱ्या संसार करत आहे सदर महिला भक्तीभावाने एके दिवशी चाक रवाडी येथे दर्शनासाठी गेले असता गर्दीचा फायदा घेऊन चोर महिलांनी तिच्या अंगावरील सर्व सोने लुटून नेले सदर महिलेने नेकनूर पोलिसात धाव घेतली असता १९ जानेवारी २०२६ रोजी नेकनूर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला मात्र अद्याप पर्यंत त्या वृद्ध महिलेचे सोने सापडले नाही

याबाबत अधिक माहिती अशी की बीड शहरामध्ये वृद्ध जोडपे राहते शशिकला दिगंबर माळगे या वृद्ध महिला दोन-चार घरची धूनी भांडी करून आपल्या पतीसह स्वतःची उपयोजिका भागवत आहेत सदर महिला देवावर श्रद्धा ठेवणारे असून असून सदर महिला भक्तिभावाने



चाकरवाडी येथे देवदर्शन साठी गेले असता गर्दीचा फायदा घेत तिच्या अंगावरील अकरा हजार ९०० रुपये किमतीचे सोने चोर महिला नीलम पास केले सदर महिलेने तात्काळ आरडा खूप आरडाओरडा केला पण त्या महिलांच्या मागे पडणे होत नसल्यामुळे त्या आरडाओरडा करण्याशिवाय बाकी काहीच करू शकले नाहीत त्यामुळे त्यांनी नेकनूर पोलिसात जाऊन रीतसर फिर्याद देऊन आपले म्हणणे मांडले त्यावेळी पोलिसांनी त्यांना चोर मला महिलांचे काही फोटो हे दाखवले त्या फोटोतील महिला त्यांनी ओळखल्या पोलीस म्हणाले तुमचे सोनं तत्काळ सापडून देऊ मात्र अद्याप पर्यंत चार महिने होऊ नये नेकनूर पोलिसांना काही सोनं सापडला नाही आणि त्या वृद्ध जोडप्याला काय न्याय मिळाला नाही त्यामुळे नेकनूर पोलीस स्टेशन मध्ये कार्यरत असणारे हे खरोखर पोलीसच आहेत का चोरांचे दलाल असा प्रश्न जनतेला पडला आहे मात्र सदर महिला आपले कष्टाचे सोने चोरीला गेल्यामुळे न्यायासाठी याच्या त्याच्या दारात पटकन ती करत आहे गावात साहेब तुम्हाला आईचं काळीज असेल तर सदर महिलेला न्याय देऊन नेकनूर पोलिसांना धडा शिकवा अशी अपेक्षा सर्वसामान्य जनतेतून व्यक्त होत आहे


## जाहीर प्रगटन

**मा. श्री. मा. ये. वाघ ५ वे दिवाणी न्यायाधीश व स्तर, बीड, ता. जि. बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १९७/२०२६**

**आश्राबाई येडे वि. निरंक**

ज्यापेक्षा सर्जेराव पि. सखाराम येडे, हे दिनांक १९/०९/२०२५ रोजी मौजे मोरगाव, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहे, आणि तसेच अर्जदार- **१. आश्राबाई भ्र, सर्जेराव येडे, वय ७९ वर्षे, धंदा घरकाम, रा. मोरगाव, ता. जि. बीड, २. मच्छिंद पि. सर्जेराव येडे, वय ५१ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे, ३. राजेंद्र पि. सर्जेराव येडे, वय ४० वर्षे, धदा नौकरी, रा. वरीलप्रमाणे, ४. जानकाबाई भ्र. पंढरीनाथ कवठेकर, वय ५८ वर्षे, धंदा, घरकाम, रा उखंडा, ता. पाटोदा, जि बीड, ५. सिताबाई भ्र. बद्री जाधव, वय ५६ वर्षे, धंदा घरकाम, रा. मोरगाव, ता. जि. बीड, ६. सुमल भ्र. श्रीहरी कादगे, वय ४९ वर्षे, धंदा घरकाम, रा नागोबाचीवाडी, ता. घनसागवी, जि. जालना**

अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असुन, अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले आहेत, अर्जदार क्र. ४ ते ६ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत. या अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हकात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हकाबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा/ अर्जदारांचा हक शाबीत दिसल्यास, त्याना / अर्जदाराना सदर मयल नामे सर्जेराव पि. सखाराम येडे, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी

**प्रकरणाची पुढील तारीख २८/०४/२०२६ ही आहे.**

आज दिनांक ३० मार्च २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. **(अॅड. रोटे डी. एम. यांचे मार्फत)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व . स्तर बीड**

**शिक्का**

**(स्वाक्षरीत) क. लिपीक**

# थोडक्यात...

## कु. मनस्वी मोरे यांची प्रकल्प अधिकारी पदावर निवड

### राज्यात मुलींमध्ये प्रथम



**वडवणी । प्रतिनिधी**

कु. मनस्वी सुधाकर मोरे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही खचून न जाता जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण परिश्रम यांच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन करत महाराष्ट्र शासनाच्या हिंदी महा ऊर्जा (महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट) विभागामध्ये प्रकल्प अधिकारी या पदावर आपले स्थान निश्चित केले आहे. मनस्वी मोरे यांनी या यशामागे असंख्य दिवस-रात्र मेहनत घेतली. अपयश आले तरी न खचता त्यांनी प्रत्येक वेळी नव्या जोमाने प्रयत्न सुरू ठेवले. अभ्यासात सातत्य, योग्य नियोजन आणि आत्मविश्वास या गुणांच्या बळावर त्यांनी ही उंची गाठली आहे. विशेष म्हणजे, त्यांनी महाराष्ट्र राज्यातून मुलींच्या गटात प्रथम क्रमांक पटकावत राज्यभरात आपली छाप पाडली आहे. त्यांच्या या यशामुळे वडवणी परिसरासह संपूर्ण जिल्ह्यात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. मनस्वी यांच्या यशामागे कुटुंबीयांचे मोलाचे मार्गदर्शन, शिक्षकांचे सहकार्य आणि स्वतःची अविरत मेहनत हे प्रमुख घटक असल्याचे स्पष्ट होते. आर्थिक व सामाजिक अडचणींवर मात करत त्यांनी आपले ध्येय साध्य केले, हे त्यांच्या जिद्दीचे जिवंत उदाहरण आहे. त्यांच्या या यशामुळे आजच्या तरुण पिढीला परिस्थिती कशीही असो, जर जिद्द आणि मेहनत असेल तर यश नक्की मिळते हा संदेश मिळत आहे. मनस्वी मोरे यांच्या पुढील वाटचालीसाठी सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत असून, भविष्यात त्या आणखी मोठे यश संपादन करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## प. पू. गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेद महाविद्यालयाचा उल्लेखनीय निकाल



**माजलगाव । प्रतिनिधी**

परम पूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेद महाविद्यालयाने यंदाच्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले असून विद्यार्थ्यांनी उत्तम गुणवत्तेचे प्रदर्शन करत महाविद्यालयाचा गौरव वाढविला आहे. बीएएमएस द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट टक्केवारी मिळवत यशाची नोंद केली आहे. परम पूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेद महाविद्यालयाचा निकाल ८८.६३% लागला असून या निकालामध्ये भावना शहाजी जाधव हिने ७०.३३% गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला आहे. धनवर्षा दयानंद बिरादार हिने ६९.७६% गुणांसह द्वितीय, तर अंकिता सुरेश उपरे हिने ६९.१९% गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल सर्वत्र विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे. महाविद्यालयातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन, नियमित अध्यापन पद्धती, तसेच विद्यार्थ्यांची मेहनत आणि चिकाटी यामुळे हा यशस्वी निकाल शक्य झाला आहे. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षकवृंद आणि पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच भविष्यातही अशाच प्रकारे उत्तम निकाल देण्याचा संकल्प महाविद्यालयाने व्यक्त केला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून महाविद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● सोमवार दि. १३ एप्रिल २०२६ ●


# शिदोड येथील 48 व्या नारळी सप्ताहाची भक्तीमय वातावरणात सांगता

## व्यसनमुक्त समाज अन् गोसंवर्धनाचा दिला संदेश

### भगवंताच्या प्रेमात रंगूतो, तेव्हा संसारातील माया, मोह आणि धनाची आसक्ती आपोआप नाहीशी होते: महंत योगीराज स्वामी महाराज

**बीड । प्रतिनिधी**

भक्ती ही केवळ बोलण्याची किंवा प्रदर्शनाची गोष्ट नसून ती अनुभवण्याची गोष्ट आहे. जेव्हा भक्त भगवंताच्या प्रेमात रंगून जातो, तेव्हा संसारातील माया, मोह आणि धनाची आसक्ती आपोआप नाहीशी होते, असे प्रतिपादन श्री क्षेत्र रामगडाचे महंत ह.भ.प. श्री योगीराज स्वामी महाराज यांनी केले. श्री क्षेत्र संस्थान रामगडच्या वतीने शिदोड येथे आयोजित नारळी अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगता समारंभात 'काल्याच्या कीर्तनाप्रसंगी' ते बोलत होते. या वेळी संपूर्ण परिसर हरिनामाच्या गजराने आणि भक्तीमय वातावरणाने भारावून गेला होता. श्री क्षेत्र रायगडाच्या वतीने ४७ वा नारळी सप्ताह बीड तालुक्यातील शिदोड नगरीत मध्ये मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

हरीनें माझें हरीलें चित्त ।
भार वित्त विसरलें ।।१।।
आतां कैसी जाऊं घरा ।
नव्हे बरा लौकिक ।।ध्रु.।।
पारखियांसी सांगतां गोटी ।
घरची कुटी खातील ।।२।।
तुका म्हणे निवांत राहीं ।
पाहिलें पाहीं परतुनी ।।३।।

या अभंगावर निरूपण करताना श्री महंत श्री हभप योगीराज स्वामी महाराज म्हणाले की, साधक भक्त हरीनामात दंग झाले की घर दार संसार विसरुन जातात. जशा गोकुळातील गौळणी म्हणतात की, भगवंताने माझे चित्त हरण केले, म्हणजे चोरले. त्यामुळे पैसा म्हणजे धन व संसारींक बोजा म्हणजे भार आम्ही विसरुन गेलो आणि आता विसरुन गेल्या मुळे घर च लक्षात न राहील्या मुळे घरी कशी जाऊ ...आता मला लोक काय म्हणतील... लौकीका साठी हे बरे नाही

आणखी तेच मनावर धरुन लोकाबरोबर म्हणजे पारखीयां ना सांगत बसले किंवा गोष्टी करत बसले, तर हातात आलेला देव किंवा परमार्थ निघुन जाईल.

तुकाराम महाराज म्हणतात एकदा मन परमेश्वरात लीन झाले तर आपण कुठे जरी असलो तरी पाहीलेले पाहिले की मन परत येते म्हणुन निवांत राहा.

तुकाराम महाराजांच्या अभंगातून आध्यात्मिक उलगडा कीर्तनादरम्यान संत तुकाराम महाराज यांच्याहरीनें माझें हरीलें चित्त, भार वित्त विसरलें...

या अभंगावर महाराजांनी प्रभावी आणि रसाळ निरूपण केले. यावेळी बोलताना महंत श्री योगीराज स्वामी महाराज यांनी भगवंताच्या नामस्मरणात रममाण झालेल्या भक्ताला लौकिक व्यवहाराचे भान राहत नाही. आतां कैसी जाऊं घरा, नव्हे बरा लौकिक या ओळींचा संदर्भ देत त्यांनी सांगितले की, भक्तीमुळे जीवनाला खरा आनंद आणि समाधान प्राप्त होते असे सांगितले. यावेळी पुढे बोलताना योगीराज महाराजांनी कीर्तनातून केवळ अध्यात्मच नव्हे, तर विविध सामाजिक विषयांवरही मार्गदर्शन केले.आजचा समाज व्यसनाधीनतेच्या विळख्यात अडकत चालला आहे. संतांचे विचार केवळ ऐकण्यासाठी नसून ते आचरणात आणण्यासाठी आहेत, या जिवघेण्या व्यसनाधीनतेच्या विळख्यातून समाजाला आणि तरुणाला बाहेर काढण्याची ताकद केवळ संतांमध्ये आहे हे अनेक उदाहरणातून समाजाला पटवून देत

त्यांनी व्यसनमुक्त समाज घडवण्याचे आवाहन केले. श्रद्धा असावी पण अंधश्रद्धा नसावी, असा महत्त्वपूर्ण संदेश देत विवेकपूर्ण भक्तीचे महत्त्व पटवून दिले. शिक्षण, शेती आणि संस्कारांचे महत्त्व समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.शेतकरी जगला पाहिजे, तरच देश जगेल, असे सांगत त्यांनी शेतीचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच गोसंवर्धन, पर्यावरण संवर्धन आणि स्त्री सन्मान याबाबतही त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. पुंडलिक वरदे हरी विठ्ठल... च्या जयघोषात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. गेल्या सात दिवसांपासून सुरू असलेल्या या सप्ताहात महाराष्ट्रातील नामवंताने दिग्गज अशा विविध कीर्तनकारांनी हरिनामाचा जागर केला. काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. शिदोडसह परिसरातील हजारो भाविकांनी या सोहळ्यात सहभाग घेतला.

पुंडलिक वरदे हरी विठ्ठल... च्या जयघोषात आणि विठ्ठल-रखुमाईच्या नामस्मरणात या नारळी सप्ताहाची भक्तिमय वातावरणात उत्साहपूर्ण सांगता झाली. संतविचार, हरिनाम आणि समाजप्रबोधनाचा संगम घडवणारा हा सप्ताह शिदोडच्या आध्यात्मिक परंपरेला अधिक समृद्ध करणारा ठरला. या कार्यक्रमाचे आभार रंजित बापू कदम यांनी मानले. तर हा सप्ताह यशस्वी करण्यासाठी सर्व शिदोड ग्रामस्थ आणि पंचक्रोशीतील नागरिकांनी परिश्रम घेतले. मागील सात दिवसापासून सुरू असणाऱ्या सप्ताहाच्या कार्यक्रमाला बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातील भाविक भक्त लाखोंच्या संख्येने उपस्थित होते.



### ● दिग्गज कीर्तनकारांची मांदियाळी

**सप्ताहादरम्यान विविध नामवंत कीर्तनकारांनी ज्ञानयज्ञ रंगवला. महंत जनार्दन महाराज, शिवा महाराज बास्कर, निवृत्ती महाराज इंदुरीकर, ज्ञानेश्वर महाराज तांबे, संजय महाराज पाचपोर, जयवंत महाराज बोधले, पुरुषोत्तम महाराज पाटील यांच्यासह अनेकांनी हरिनामाचा जागर केला. ह.भ.प. अंकुर महाराज साखरे यांच्या 'संगीत रामकथे'ने भाविकांना मंत्रमुग्ध केले.**

### ● मान्यवरांची उपस्थिती, ग्रामस्थांचे मोलाचे योगदान

**या सोहळ्यासाठी गेवराई विधानसभेचे सदस्य आ.विजयसिंह पंडित, बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांचे चिरंजीव सौरभ सोनवणे, माजी मंत्री बदामराव आबा पंडित, शिवसेनेचे कुंडलिक बापू खांडे, शामराव अण्णा पडुळे यांच्या सूनबाई पूजाताई पडुळे, माजी जि.प.सदस्य दिलीप गोरे, शिवसेना जिल्हाप्रमुख चंद्रकांत नवले, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह इतर राजकीय व सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावली. शिदोडसह परिसरातील हजारो भाविकांनी या सप्ताहात सहभाग घेतला.**

## सुलोचनाबाई नामदेव डोईफोडे यांचे निधन

**इट । प्रतिनिधी**



सुलोचनाबाई नामदेव डोईफोडे (वय ७५) यांचे अल्पशा आजाराने राहत्या घरी रविवारी दुपारी मौजे इट येथे निधन झाले. त्यांच्या पश्चत एक मुलगा मुलगी आहे. त्यांना भजन व कीर्तनाची अवड असल्याने गावात व नातेवाईकांमध्ये त्याच्या जाण्याने हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्या दुःखात दैनिक मराठवाडा पत्र परिवार सहभागी आहे. त्यांच्या आत्म्यास ईश्वर सदगती देवो.

## जय भवानीत भागवत जाधव यांचा सेवापूर्ती निमित्त सेवागौरव

**पाटोदा । प्रतिनिधी**

जय भवानी महाविद्यालया तील कनिष्ठ लिपीक भागवत बाबासाहेब जाधव हे नियत वयोमानानुसार दि. ३१ मार्च २०२६ रोजी सेवानिवृत्त झाले . त्यांच्या सेवापूर्ती निमित्त महाविद्यालयात त्यांचा सेवागौरव करण्यात आला. या सेवागौरव समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणुन माजी प्रचार्य प्रा. मोहन परजने व जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर गढी चे प्राचार्य डॉ. विश्वास कदम हे होते. तर व्यासपीठावर मा. श्री. बप्पासाहेब जाधव , स्थानिक नियामक मंडळाचे सदस्य मा. दिलीपराव जाधव , माजी प्राचार्य प्रा.डॉ. सय्यद शौकत आदि मान्यवरांची उपस्थिती होती. प्रारंभी प्रस्ताविक प्रा..डॉ.वंदन जाधव यांनी केले.या प्रसंगी वेदविद्या शिक्षणात अतिउत्तम ठरणारा विद्यार्थी धसे हर्ष या विद्यार्थाचा मान्यवरांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला.सत्कारमुर्ती श्री. भागवत जाधव यांचा सर्व मान्यवरांच्या शुभहस्ते सपत्नीक शाल ,पुष्प गुच्छ, सन्मान चिन्ह व संपूर्ण कपड्याचा आहेर देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी माजी प्राचार्य डॉ . सय्यद शौकत , प्रमुख पाहुणे माजी प्राचार्य प्रा.मोहन परजणे यांनी श्री. भागवत जाधव यांच्या कार्यालयीन कामकाजाचे अनुभव सांगुन त्यांच्या भावी आयुष्याला शुभेच्छा! दिल्या. मार्गदर्शक प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी श्री.भागवत जाधव यांनी महाविद्यालयात केलेल्या कामाचे कौतुक करून त्यांची महाविद्यालयास उणिव भासेल असे सांगुन त्यांच्या कामाचे कौतुक करून त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. सत्काराला उत्तर देताना श्री. भागवत जाधव यांनी सांगितले की मी याच महाविद्यालयात शिक्षण घेतले व या महाविद्यालयात सेवा करण्याची मला शिक्षण महर्षी माजी मंत्री मा.शिवाजीरावदादा पंडित व माजी आ.अमरससिंह भैय्यासाहेब पंडित व मा.जयभाऊ पंडित यांच्यामुळे मला संधी संधी मिळाली हे मी कधीही विसरणार नाही.काम करताना सर्वांनी मला सहकार्य केले. हे मी कधीही विसरणार नाही.

काम करताना माझ्याकडून कोणाचे मन दु:खावले असेल तर मला मोठ्या मनाने माफ करावे असे सांगताना त्यांना आपले आश्रु आवरता आले नाहीत.ते भावनिक झाले होते. शेवटी अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे यांनी श्री. भागवत जाधव यांच्या प्रमाणिक कामाचे कौतुक करून त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा! दिल्या. जेव्हा जेव्हा महाविद्यालयाला गरज पडेल तेव्हा हक्काने महाविद्यालयाच्या कामास मदत करावी असे अहवान केले. कार्यक्रमाचे संचलन श्रीमती प्रा.डॉ.कल्पना घारगे यांनी केले तर आभार कनिष्ठ विभागाचे प्रमुख प्रा.प्रकाश नाईकवाडे यांनी मानले या प्रसंगी माजी कार्यलयीन अधिक्षकआबेद चाऊस , अरुण काका मठपती, ईंजी.राज जाधव श्रीमती रेखाताई जाधव व त्यांचे स्नेही, सर्व प्राध्यापक वृंद, सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद,व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.



### भीमगीतांच्या स्पर्धेतून समतेची हाक

## जयभीम महोत्सवात भीमगीत गायन स्पर्धेला प्रतिसाद



**बीड । प्रतिनिधी**

कष्ट केलेत माझ्या भीमाने, जाती-पातीत वाटू नका रे, लय बळ आलं माझ्या दुबळ्या पोरात, बाबासाहेबांमुळे तुझ्या नी माझ्या घरात... अशा क्रांतिकारी भीमगीतांनी बीड शहर दुमदुमून गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शनिवार (दि.११) रोजी भव्य भीमगीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला नागरिकांसह युवक-युवतींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्पर्धेची सुरुवात अजय सवाई व त्यांचे सुपुत्र यश सवाई, पियुष सवाई यांनी भीमगीत सादर करून केली. त्यांच्या सादरीकरणातून आंबेडकरी चळवळीचा जाज्वल्य विचार आणि समतेचा संदेश प्रभावीपणे पोहोचला.

# देवदुत ओमप्रकाश शेटे यांनी शाळेसाठी पुढाकार घेऊन चिमुकल्यांसाठी संजीवनी बनावं !

## काळेगाव थडी जिल्हा परिषद शाळा मरणासन्न अवस्थेत ; झाडाखाली भरतेय वर्ग : डॉ. गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील काळेगाव थडी येथील जिल्हा परिषद शाळेची इमारत अत्यंत जीर्ण अवस्थेत असून, विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून शिक्षण घ्यावे लागत आहे. इमारत कधीही कोसळण्याची भीती असल्याने सध्या विद्यार्थ्यांचे वर्ग झाडाखाली भरत असल्याची गंभीर परिस्थिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू देवदुत म्हणून ओळखले जाणारे ओमप्रकाश शेटे यांनी या शाळेसाठी 'देवदूत' ठरून नव्या इमारतीसाठी शासन दरबारी पाठपुरावा करून शाळेतील विद्यार्थ्यांसाठी संजीवनी बनावं अशी मागणी केली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला असुन नविन शाळा इमारतीसाठी तातडीने निर्णय घेण्याची गरज असल्याचे डॉ.गणेश ढवळे यांनी म्हटले आहे.





**१९६३ ची इमारत; जीवघेणी परिस्थिती-** शाळेची इमारत १९६३ साली विटा आणि चुन्यापासून बांधलेली असून सध्या ती अत्यंत धोकादायक अवस्थेत आहे. भिंतींना मोठे तडे गेले आहेत, पत्रे गंजून गळती होत आहे, तसेच सिमेंटचे खपले कोसळत आहेत. अनेकदा वर्गात साप व विंचू आढळल्याच्या घटनाही घडल्या आहेत. इमारत कधी कोसळेल याचा नेम नसल्याने विद्यार्थ्यांना झाडाखाली बसवून शिक्षण द्यावे लागत आहे. वारंवार वरिष्ठ कार्यालयाकडे पाठपुरावा करूनही दखल घेतली जात नाही, अशी खंत मुख्याध्यापक बाळासाहेब काकडे यांनी व्यक्त केली.

**मुलभूत सुविधांचा अभाव-** शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आगाजी तौर यांनी सांगितले की, पिण्याच्या पाण्याची सुविधा नाही. शौचालयांची कमतरता. पोषण आहारासाठी स्वतंत्र स्वयंपाकगृह नाही. या सर्व बाबींमुळे विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. ज्ञान मंदिराकडेही लक्ष द्यावे- ।जलगाव तालुक्यातील पुरुषोत्तम पुरी, शुक्लतीर्थ व वांगी देवस्थानांच्या विकासासाठी ओमप्रकाश शेटे यांनी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला आहे. त्याचप्रमाणे जिल्हा परिषद शाळांसारख्या ज्ञान मंदिरांकडेही लक्ष देऊन काळेगाव थडीसह इतर जीर्ण शाळांच्या इमारतींसाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी डॉ. ढवळे यांनी केली आहे.